जा .क्र. तंशिविकापु/आस्था-३(अ)/अपंगकर्मचारी/सुविधा/२०१९/ 4101

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
पुणे – ४११०१६
दिनांक : ०१/१०/२०१९
01 OCT 2019

प्रति,

संचालक/प्राचार्य/उपसचिव,
सर्व शासकीय संस्था/कार्यालये
सर्व अशासकीय अनुदानित संस्था

विषय :- लोकसभा निवडणूक २०१९ मध्ये दिव्यांग व्यक्तीची मतदार म्हणून नोंदणी व त्यांना मतदानासाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या सुविधांबाबत

संदर्भ :- संचालनालयाचे पत्र क्र.२अ/एडीएम/निवडणूक/२०१९/७३९, दि. १९/०९/२०१९

त्यांना कळविण्यात येते की, उपरोक्त संदर्भीय पत्राचे अवलोकन करण्यात येवून दिव्यांग मतदारांना निवडणूक प्रक्रियेमध्ये सामावून घेण्याच्या दृष्टीने उपाययोजना, पुरविण्यात येणाऱ्या सोयी सुविधांची अमलंबजावणी करण्यात यावी. तसेच दिव्यांग मतदारांची टक्केवारी आगामी विधानसभा निवडणूकीत वाढण्याच्या दृष्टीने मुख्य निवडणूक अधिकारी यांनी दिलेल्या सुचनांचे अवलोकन करण्यात यावे.

**सोबत : संचालनालयाचे पत्र**

प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत : प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेसाठी

तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४००००१
दूरध्वनी - २६२०६०१, २६९०६०२ २६४११५०/५१, फॅक्स - २६९२१०२.
E-mail : desk2a@ dtemaharashtra.gov.in Intern:http/www.dtemaharashtra.gov.in

क्र.२अ/एडीएम/निवडणूक/२०१९/739
दि. 19 SEP 2019

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक/ औरंगाबाद/अमरावती / नागपूर

विषय : लोकसभा निवडणूक -२०१९ मध्ये दिव्यांग व्यक्तीची (Person with Disability) मतदार म्हणून नोदणी व त्यांना मतदानासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या सुविधांबाबत.

संदर्भ : १) मा.उपसचिव व सह मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र.ईएलआर-२०१८/प्रक्र१७७/३३ दि.७ ऑगस्ट २०१९.
२) मा.अवर सचिव व उप मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र.ईएलआर-२०१८/प्रक्र१७७/३३,दि.२९ ऑगस्ट २०१९.

वरील विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, अपंगाना लोकशाही प्रक्रियेमध्ये सामावून घेण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने घोषित केलेल्या " सुलभ निवडणूका (Asccessible Election) या विषयाच्या अनुषंगाने दिव्यांग मतदारांना निवडणूक प्रक्रियेमध्ये सामावून घेण्याच्या दृष्टीने करण्यात आलेल्या उपाययोजना, पुरविण्यात आलेल्या सोयी सुविधा व त्यात असलेल्या अडचणी व त्यावरील उपाययोजना याबाबत आढावा घेण्यासाठी मुख्य निवडणूक अधिकारी, यांच्या अध्यक्षतेखाली राज्य स्तरीय समितीची बैठक दि.१३/८/२०१९ रोजी घेण्यात आली होती.

सदर बैठकीत भारत निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार राज्याच्या आगामी सार्वत्रिक विधानसभा निवडणूक - २०१९ ची तयारी करताना खालील मुदयांच्या अनुषंगाने तात्काळ कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले.

१. दिव्यांग मतदारांची मतदार म्हणुन नोंदणी ( New Voters Registration as PWD Voter) करणे.
२. अपंग मित्र विदयार्थीची नेमणूक व प्रशिक्षण .
३. दिव्यांग व्यक्तींना मतदान केंद्रावर जाण्यासाठी व्हील चेअर(Wheel chair) करीता रॅम्प तयार करणे.
४. दिव्यांग व्यक्तींना मतदान केंद्रावर जाण्यासाठी व्हील चेअर(Wheel chair) उपलब्ध करुन देणे.
५ मतदार नोंदणी व मतदानासाठी दिव्यांग व्यक्तींची आकडेवारी उपलब्ध करुन देणे.

आस्था ३(ब) 
लिपिक
२/९/१९

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
21 SEP 2019
आवक क्र. 9305

192.168.1.9\Desk2a\Desk 2a- 3 (khanolkar)\Letter to R O.29.doc

उपरोक्त मुद्याच्या अनुषंगाने दिनांक २०/३/२०१९ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त, दिनांक १३/८/२०१९ रोजीच्या बैठीकीची विषय सूची, इतर माहिती पत्रक व सदर बैठकीचे इतिवृत्त इत्यादीच्या प्रतीसह आवश्यक त्या पुढील कार्यवाही सोबत जोडण्यात आल्या आहेत.

तरी आपणांस कळविण्यात येते की, दिव्यांग मतदारांची टक्केवारी आगामी विधानसभा निवडणूकीत वाढण्याच्या दृष्टीने मुख्य निवडणूक अधिकारी यांनी दिलेल्या सुचनेनुसार उचित कार्यवाही करण्यासाठी आपल्या विभागातील सर्व संस्थांना सूचित करावे व याबाबत पाठपुरावा करावा.

(डॉ. अभय वाघ)
संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई

प्रत : मा.मुख्य निवडणुक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२ यांना माहितीकरिता सविनय सादर.

**विषय : दिव्यांग व्यक्तींची मतदार म्हणून नोंदणी व त्यांना मतदानासाठी उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या सुविधांबाबत बैठक.**

भारत निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०१९ च्या अनुषंगाने मा.प्रधान सचिव तथा मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या दालनात National Advisory Committee on Accessible Elections (NACAE) ची **दिनांक २० मार्च, २०१९ रोजी दुपारी ३-०० वाजता बैठक** आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालीलप्रमाणे अधिकारी उपस्थित होते.

- श्री. दिनेश वाघमारे, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
- श्री. दिनेश रा. डिंगळे, सह सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई. (M-9967418734)
- श्री. ता.मा.कोळेकर, सह सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई (M-99892283067)
- श्री. सुनिल बांठेकर, मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई (M-9011053111)
- श्री. नितीन ढगे, उपायुक्त, अपंग कल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे
- श्री. गिरीश कांबळे, राज्य प्रशिक्षण आयुक्त, (M-9619330566)
- डॉ. राजीव शेटकर, उपसंचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, (M-9420633830)
- डॉ. नितीन आंबेडकर, सहसंचालक (आरोग्य) (M-9423125197)
- श्रीमती श्रुती सावंत, सहायक लेखा अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण (NSS) (M-8356032950)
- श्री. प्रविण शिशुपाल, सहायक कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई. (M-8652150808)
- श्री. शंकर राठोड, प्रतिनिधी, शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक, पुणे (M-9967444630)
- श्री. युवराज पवार, अपंग महामंडळ (M-8605466655)
- डॉ. रोहिदास काळे, उच्च शिक्षण (M-9923060394)
- श्री. गंगाधर म्हमाणे, शिक्षण संचालक, पुणे (M-9096548385)
- श्रीमती नेहा हुमरसकर, शालेय शिक्षण (M-9987253424)
- श्री. निलेश सिंगीत, दिव्यांग कल्याण कार्यकर्ता, मुंबई
- श्रीमती इंद्रायणी मलकानी, Managing Trustee, V Citizens Action Network (VCAN), Malabar Hill, Mumbai.

सदर बैठकीमध्ये खालीलप्रमाणे मुद्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली आहे.

**१] उपस्थित केलेला मुद्दा:-**

- दिव्यांग व्यक्तींना प्रत्येक मतदान केंद्रावर जाण्यासाठी व्हील चेअर करीता रॅम्प तयार करणे
- अपंग मतदानाकरीता National Consultation on Accessible Elections for People with Disabilities (PwDs) या ॲपची सुविधा.

**करावयाची कार्यवाही :-**

- महाराष्ट्र राज्यातील सर्व मतदान केंद्रावर मतदानासाठी दिव्यांग व्यक्तींसाठी रॅम्प ची सुविधा करण्याकरीता बैठकीमध्ये ठरल्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाकडून यासंदर्भात योग्य ती कार्यवाही केली जाईल असे श्री. सुनिल वांठेकर, मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी आश्वासित केले आहे.
- दिव्यांग व्यक्ती यांना लोकशाही प्रक्रियेमध्ये सहभागी होणे सुलभ व्हावे या हेतूने (PwDs) App द्वारे खालीलप्रमाणे सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत:-

(i) Request for Marking as PwDs

- ज्या दिव्यांग व्यक्तींनी मतदानासाठी मतदान नोंदणी केलेली नाही किंवा त्यांनी आतापर्यंत कोणत्याही प्रकारचे आतापर्यंत मतदान केलेले नाही., अशाकरीता निवडणूक कार्यालयाने (PwDs) App उपलब्ध करुन दिले आहे.
- दिव्यांग व्यक्तींनी (PwDs) App चा वापर केल्यास मतदान केंद्रावर किती व कोणत्या प्रकारचे दिव्यांग व्यक्ती येणार आहेत यांची आकडेवारी केंद्र प्रमुखांना उपलब्ध होईल व त्यानुसार आवश्यक त्या सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतील.
- (PwDs) App चा मुख्य उद्देश दिव्यांग व्यक्तींनी मतदानापासून वंचित राहू नये, असा आहे.
- (PwDs) App च्या वापरामुळे दिव्यांग व्यक्तींची महाराष्ट्रातमध्ये किती लोकसंख्या आहे, याची आकडेवारी उपलब्ध होऊ शकते.

(ii) New Voters Registration as PwDs

- दिव्यांग व्यक्तींनी आपल्या नावाची नोंदणी केल्यास, त्यानुसार सर्व मतदान केंद्रावर उपलब्ध असलेल्या यादीमध्ये त्यांच्या नावांसमोर दिव्यांग असे चिन्हांकित करुन तसेच छापण्यात येईल. त्यामुळे केंद्र प्रमुख यांना त्यांच्या मतदान केंद्रावर किती दिव्याग व्यक्ती आहेत, याची माहिती उपलब्ध होईल. याकरीता दिव्यांग व्यक्तींनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवून नवीन मतदार यादीमध्ये नावाची नोंद करावी.

(iii) Request for Transfer

- दिव्यांग व्यक्तींच्या स्थानांतरणाबाबत (PwDs) App मध्ये माहिती भरल्यास Booth Level Officer (BLO) हे त्यांच्या घरी जाऊन स्थानांतरणाबाबत आवश्यक ती माहिती घेऊन त्यानुसार कार्यवाही करेल.

(iv) Request for Change (Correction / Deletion)

- दिव्यांग व्यक्तींच्या नावांत / निवासस्थान यांच्यात बद्दल / रद्द करावयाचा असल्यास (PwDs) App मध्ये माहिती भरल्यास Booth Level Officer (BLO) हे त्यांच्या घरी जाऊन बदलाबाबतची आवश्यक ती माहिती घेऊन त्यानुसार कार्यवाही करेल.

(v) Request for Wheel Chair

- दिव्यांग व्यक्तींनी (PwDs) App मध्ये व्हिल चेअर उपलब्ध करुन देण्याबाबत विनंती केल्यास त्यानुसार मतदानाच्या दिवशी दिव्यांग व्यक्ती यांना विनामुल्य व्हिल चेअर उपलब्ध करुन देण्यात येईल.
- त्याकरीता (PwDs) App मध्ये माहिती भरणे आवश्यक आहे.

(vi) Booth Locator

- दिव्यांग व्यक्तींनी (PwDs) App चा वापर केल्यास आपले मतदान केंद्र कुठे आहे तसेच त्या ठिकाणी जाण्याची मार्गिका कोणती, याबाबत सविस्तर माहिती उपलब्ध होईल.

२] उपस्थित केलेला मुद्दा:-

- मतदानाच्या दिवशी दिव्यांग व्यक्तींना मदत करण्यासाठी भारत स्काऊट ॲन्ड गाईड्स व राष्ट्रीय सेवा योजना (National Service Scheme) यांची मदत घेणे

करावयाची कार्यवाही :-

भारत स्काऊट अॅन्ड गाईड्स तसेच राष्ट्रीय सेवा योजना (National Service Scheme) यांनी संपूर्ण महाराष्ट्रामध्ये स्वयंसेवक म्हणून विद्यार्थी उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. याकरीता त्यांनी आपल्या अधिपत्त्याखालील असलेल्या सर्व कार्यालयांना तशा प्रकारच्या सूचना निर्गमित करुन त्यांना जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळवावे. याकरीता स्वयंसेवकांच्या मार्गदर्शक सूचना वेगळ्याने निर्गमित करण्यात येत आहेत.

३] उपस्थित केलेला मुद्दा:-

- दिव्यांग व्यक्तींचा मतदानामध्ये साक्षरतेचे प्रमाण वाढविणेबाबत.

करावयाची कार्यवाही :-

शालेय शिक्षण विभाग व शिक्षण संचालक, पुणे यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी दिव्यांग व्यक्तींमध्ये साक्षरतेचे प्रमाण वाढविण्यासाठी महाराष्ट्र राज्यातील सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये विशेष मोहिम राबविण्यात यावा. तसेच त्यांच्या नियंत्रणाखालील असलेल्या सर्व जिल्हा शिक्षण अधिकारी यांना आवश्यक त्या सूचना निर्गमित कराव्यात.

४] उपस्थित केलेला मुद्दा:-

- दिव्यांगाचे मतदार यादीतील प्रमाण वाढविणे.

करावयाची कार्यवाही :-

अपंग कल्याण आयुक्तालय, पुणे यांनी सर्व जिल्ह्यातील अपंगाच्या लोकसंख्येची आकडेवारी त्वरीत उपलब्ध करुन द्यावी, तसेच दिव्यांगाची प्रत्यक्ष लोकसंख्या व मतदार यादीतील दिव्यांगाची संख्या यामधील तफावत दूर करण्याच्या कामी सर्व सहकार्य देण्याच्या सूचना प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांनी निर्गमित कराव्यात. तसेच दिव्यांग विषयक सर्व प्रयोजनासाठी श्री. नितीन ढगे, उपायुक्त, पुणे यांची नोडल ऑफिसर (State Nodal Officer) म्हणून नियुक्ती करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

मा.प्रधान सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी यांनी दिव्यांग व्यक्ती मतदार मतदानापासून वंचित राहू नये याकरीता आवश्यक ते प्रयत्न करुन निवडणूकीचा कार्यक्रम सुरळीत पार पाडण्यात यावा, अशा सूचना दिल्या. तसेच उपस्थितांचे आभार मानून बैठक समाप्त करण्यात आली.

**************************

Meeting of State Steering Committee on Accessible Elections (SSCAE) on 13th August 2019

Support expected from following departments:

1) School/Higher Education Department:

- Voter Literacy: PwD students in schools shall be educated about their right with respect to the electoral process.
- PwD student should be motivated through NGO/Brand Ambassabor/Apang Mitra to participate in electoral process such as electoral registration, voting etc.
- It is also requested to add chapter on electoral process and right to vote in the syllabus of students
- Students including PwD shall be made aware about Assured Minimum Facilities (AMF) at the polling station so nobody shall be deprived of basic voting rights due to non-availability of ramp or wheel chairs etc.

2) **Public Health Department:**
- Making availability of PwDs data to the CEO office
- Making availability of chairs for PwD voters
- Arrangement of medical assistance/kit at polling stations

3) **Social Justice and Special Assistance Department:**
- Management and availability of PwD data with the help of Commissioner, PwD
- Manpower of the schools, hostels, colleges of PwDs shall be made available to the election machinery
- Volunteers to be made available as Apang Mitra at polling stations


4) **Public Works Department:**
- Ensure support for Assured Minimum Facilities (AMF) at Polling stations as per ECI guidelines
- Ensure proper ramp for PwDs as per standard gradient 1:10
- Arrangement of PwD friendly furniture
- Accessibility to the polling stations such as approach roads and ramps

5) **NCC, NSS, NYKS and Bharat Scouts and Guides:**
- Provide volunteers as Apang Mitra at polling stations during the polling day
- Apang Mitra and volunteers shall help the PwD voters to reach to the polling stations

6) Engagement of NGOs/CSOs:

- NGOs/CSOs shall support in public awareness
- Support in publicity campaign
- Reach out to PwD organizations
- Adopt the polling stations where PwD voters will participate in voting process
- Motivate PwD electors for registration and voters to participate in voting process
- Facilitate PwD voters to participate in electoral process

महाराष्ट्र



प्रिय निवडणूक अधिकारी,
आपल्या लोकशाहीची परंपरा जतन करण्याचे तुमचे प्रयत्न खरोखरच स्तुत्य आहेत. बदल घडवून आणण्यासाठी तुम्ही तयार आहात!
अपंग मतदारासंबंधी जागरूक राहण्याचे लक्षात ठेवाल ना ?
यासंबंधी काही सुचवायचे आहे –

**अपंगत्व नव्हे, तर आपले नकारात्मक विचार आणि कृती माणसाला असमर्थ बनवतात.**

**अपंग व्यक्तींनाही मतदानाचा समान अधिकार आहे.**

## अपंगत्वाचा अर्थ आपल्या कितपत लक्षात आला आहे ?

शरीर, इंद्रिय किंवा मेंदूची अक्षमता असलेल्यांच्या बाबतीत अपंगत्वाचा खरा अनुभव तेव्हाच येतो जेव्हा आजूबाजूच्या प्रणाली व व्यक्तींचे दृष्टीकोन त्यांच्या पूर्ण व प्रभावी सहभागाच्या आड येतात.

अपंग व्यक्तींच्या कार्यक्षमतेवर विश्वास ठेवणे कधीही फायद्याचे असते.

अपंग व्यक्तींना काय काय करता येते याची यादी मोठी आहे. त्यांना काय करता येत नाही याचा केवळ एकांगी विचार करू नका.

कायिक, संवेदना आणि चेतना क्षमतेनुसार अपंगत्वाचे वेगळे प्रकार आणि स्तर असतात. कधीकधी वयोमानानुसार अथवा तात्पुरते अपंगत्व आलेले असते. **अपंगत्व कधीही, कुणालाही, कुठेही येऊ शकते.**

सर्व धर्मांच्या, पंथांच्या तसेच सामाजिक-आर्थिक स्तरांतील लोकांमध्ये अपंगत्व आढळून येते. आपल्या अवतीभवती असलेले त्यांचे प्रमाण आपल्या कल्पनेपेक्षा अधिक आहे.

**म्हणूनच त्यांना मतदानाचा हक्क मिळेल याची खात्री करू या.**

## आपला सदाचार कसा असावा?

आपल्याला इतरांकडून जी वागणूक अपेक्षित असते तशीच त्यांच्या प्रति आपली वागणूक असली पाहिजे

अपंग मतदारांना सामोरे जाताना:

**हे करा:** मतदान प्रक्रियेचे गांभीर्य ढळू न देता अपंग व्यक्तींचे मोठ्या रांगेत उभे राहणे आणि त्यांचा खोळंबा कसा टाळता येईल याचा विचार करा. यासाठी त्यांना प्राधान्याने प्रवेश, स्वतंत्र रांग आणि इतर लोकांना जागरूक करणे असे काही मार्ग निवडू शकता.

**हे टाळा:** अपंगत्व असणाऱ्या व्यक्तीशी थेट संपर्क साधा, त्यांच्या सहकाऱ्यांशी नव्हे.

**हे निवडा:** सुयोग्य शब्दांची निवड करा. शब्दांचे सामर्थ्य ओळखून अपंग व्यक्तींशी बोलताना, त्यांना संबोधित करताना विशेष काळजी घ्या. कमजोर, लुळा, मुका, दुबळा; यासारख्या शब्दांचा वापर करू नका.



## अपंग मतदारांना सामोरे जाताना:

अपंगत्व असलेल्या आणि विशिष्ट गरजा असलेल्या सर्व व्यक्तींबाबत

- संयमी राहा आणि त्यांच्या समस्या जाणून घ्यायचा प्रयत्न करा.
- काही बाबी नीट समजून घेण्यासाठी त्यांना पुन्हा बोलण्याची किंवा लिहून देण्याची विनंती करा
- अशा व्यक्तींना हसू किंवा खिजवू नका.
- बाह्य रूपावरून अपंगत्व गृहीत धरू नका, अपंगत्व अदृश्य सुद्धा असू शकते.
- काम सोपे व्हावे, यासाठी शेवटपर्यंत तत्पर राहा.
- एखाद्या बुटक्या व्यक्तीला मतदान यंत्राची उंची किंवा जागा यात बदल करण्याची आवश्यकता भासू शकते.
- दृष्टी कमी असलेल्या व्यक्ती, मनोसामाजिक अपंगत्व असलेल्या व्यक्ती तसेच इतर अधिक आधाराची आवश्यकता असलेल्या व्यक्तींना मतदान केंद्रात ज्यादा वेळ द्या.
- प्रथमच मतदान करीत असलेल्या मतदारांना उमेदवारांच्या बटणापुढे असलेल्या लाल दिव्याचा अर्थ समजावून सांगा. कारण मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यावर येणारा प्रदीर्घ बीs ssss प असा आवाज कदाचित ते ऐकू शकणार नाहीत.

### दृष्टिदोष असलेल्या मतदारांना सहाय्य करण्यासाठी:

- अशा मतदारांशी बोलून आणि त्यांच्या हाताला स्पर्श करून त्यांचे लक्ष वेधून घ्या आणि काही मार्गदर्शन हवे आहे का हे विचारा.
- सूचना/निर्देश यांचे (अगदी मतदानाच्या बूथपर्यंत कसे जायचे याविषयी) तोंडी मार्गदर्शन करा.
- मतदान यंत्रावर असलेली ब्रेल लिपीतील पट्टी परिचित करून देऊन मतदारांना यंत्राविषयी नेमक्या सूचना द्या. ब्रेल विभाग आणि ब्रेल उमेदवार यादी / ब्रेल मतपत्रिकेविषयी मतदाराला अचूक माहिती द्या.


### कर्णबधिर मतदारांना सहाय्य करताना:

- त्या मतदारांशी समोरासमोर बोला आणि त्यांच्या नजरेला नजर भिडवून त्यांचे लक्ष वेधून घ्या.
- सावकाश बोला. कायिक भाषा, खाणाखुणा, हावभाव यांद्वारे त्यांच्याशी संवाद साधा.
- तुमचे म्हणणे लिहून स्पष्ट करण्याचा प्रयत्न करा.

### व्हीलचेअरचा वापर करणाऱ्यांसाठी:


- व्हीलचेअर वापरणारे मतदार केंद्रांवर जाणे, खुर्ची हलवणे, वळवणे या क्रिया सहजतेने करू शकतील याची खात्री करून घ्या.
- व्हीलचेअरची उंची लक्षात घेऊन मतदान यंत्रापर्यंत ते सहज पोहोचू शकतील याची खातरजमा करा.

मित्रांनो,
**अपंगत्व असणाऱ्या व्यक्तींना मतदानाचा समान अधिकार आहे.**
तो बजावण्यासाठी तुम्हीच सहाय्य करू शकता.
वर उल्लेख केलेल्या गोष्टींचा अवलंब करून प्राप्त परिस्थितीशी जुळवून घ्या.
कुठल्याही अपंग व्यक्तीला मतदानापासून वंचित ठेवू नका.



महाराष्ट्र

Maharashtra



**Dear Election Personnel,**

Your efforts to maintain the democratic tradition of our nation is second to none. You are all set to make a difference. Allow us to remind you to be more sensitive towards voters with **DISABILITIES.**

**Here are some suggestions!**

Disability does not make a person incapable, our actions and attitudes do!!!

**People with disabilities have equal right to vote**

## How well do you understand disability?

Disability is actually experienced when one's impairment in body, senses or brain, in interaction with the barriers in the environment, systems or people's attitude hinders one's full and effective participation in society on an equal basis with others.

**It is always better to assume competence in persons with disabilities (PwDs)**

**There are more things that persons with disabilities CAN DO than what s/he CANNOT**

There are various types and degrees of disabilities including physical, sensory and neuro-developmental disabilities. There are also temporary as well as elderly disabilities. **Disability can happen to anybody, at anytime, at any place.**

People with disabilities are from all religions, ethnic backgrounds and socio-economic stratas. They are around us in more numbers than we can imagine.

**LET US ENSURE THEIR RIGHT TO VOTE!**


## Interacting, addressing voters with disabilities

**THINK** how you can avoid making PwDs wait in long queues. Priority entry, separate queue, requesting others to be sensitive are a few ways YOU can adopt without diluting the sanctity of the electoral system !

**TALK** to a person with disability directly rather than his/her companion

**CHOOSE** words appropriately. Words are powerful so be careful when addressing / speaking to/about persons with disability.

Donot use terms likehandicapped, dumb, victim, patient



### Basic Etiquette

Etiquette is the right word to use to describe the thoughtful, considerate behavior that we expect to receive from others and give in return. Here is what you can keep in mind!

**For all PwDs and people with specific needs:**

- Be patient and try to understand their questions
- Request them to repeat or write to make things clear
- Never tease or laugh at the person
- Do not assume disability by appearance, disability may be invisible too
- Be ready to provide end to end accessibility
- A short person may need adjustment in height or positioning of ballot unit
- Allow extra time for a person with low vision, psycho-social disability or other high support needs to complete the tasks at polling booth
- For the first-time voters clearly explain in advance about the red light against candidate buttons as they may not be able to hear the long beep which indicates end of voting

**When supporting a voter with visual impairment:**

- Get the voters attention by speaking and touching the voters arm and ask if s/he needs to be guided
- Give all directions/instructions verbally, including direction to the ballot area
- Get acquainted with the Braille strip on the ballot unit and provide precise instructions to the voter about the ballot unit, braille section and braille candidate sheet/braille ballot sheet
- You may need to guide their fingers to the appropriate place for signing

**When supporting a voter with hearing impairment:**


- Get the persons attention before speaking, face him/her and maintain eye contact
- Speak slowly, use body language, gestures and facial expressions to communicate. Try writing to communicate further

**For a wheelchair user ensure:**

- That s/he can access the polling booth, move and turn in it easily
- That the Ballot unit is easily accessible keeping in mind the height of the wheelchair

Dear Friends,
PwDs have equal right to vote. It is **YOU** who can make this possible. Adopt the best practices mentioned above, and adapt to the situation in hand.

**Let us not leave any voter behind**



Maharashtra

For more information, please call on helpline number 1950 (toll free) or log on to https://ceo.maharashtra.gov.in.

Follow us on

Published in the public interest on behalf of Chief Electoral Officer, Maharashtra State.

महाराष्ट्र

# विधानसभा निवडणूक २०१९
# काय आहे तुमचा विचार?




**तुमच्या अपंगत्वामुळे येत्या २०१९ च्या मतदानापासून वंचित राहू नका. लोकशाहीला न्याय्य संधी द्या.**


१८ वर्षांवरील सर्व नागरिकांना मतदानाचा समान अधिकार आहे.

# अपंगत्व – अडथळा नव्हे.

तुमचं अपंगत्व अव्यक्त असू शकेल, तुम्ही नाही.

## तुमचं अस्तित्व जाणवू दे ! तुमचा आवाज सर्वांपर्यंत पोहोचू दे !

## चला, हे घडू दे.





### मला मतदार यादीत माझ्या नावाची नोंदणी कशी करता येईल?

- मतदार यादीत नोंद व्हावी याकरिता प्रथम फॉर्म क्र. ६ भरण्याची प्रक्रिया पूर्ण करावी लागेल. हा फॉर्म भरून त्यासोबत फोटो, ओळखपत्र, निवासस्थानाचा पुरावा अशी कागदपत्रे जोडणे आवश्यक असते.
- तुम्हाला योग्य सुविधा मिळावी म्हणून, तुम्ही तुमच्या अपंगत्वाचा तपशील बाब (च) मध्ये देऊ शकता जेणेकरून हा तपशील संबंधित मतदान केंद्रावर आवश्यक ती सुविधा पुरवण्यासाठी कळविता येईल.
- जर तुम्ही तुमचं नाव या आधीच नोंदवलं असेल आणि आता तुम्हाला तुमच्या अपंगत्वाविषयी तपशील द्यायचा असेल तर तुमच्या मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांचेशी संपर्क साधावा.

### हा फॉर्म कुठून प्राप्त करता येईल?

- आंतरजालाची उपलब्धता, कार्यपद्धती आणि त्याविषयीच्या तांत्रिक बाबी माहीत असल्यास संकेतस्थळावर जाऊन तुम्ही फॉर्म भरू शकता. **National Voters' Services Portal (NSVP)** म्हणजेच राष्ट्रीय मतदार सेवा पोर्टल **https://www.nvsp.in** इथे जा. यावर इंग्रजीमध्ये तसेच भारतीय भाषांमध्ये माहिती उपलब्ध आहे. इथे ऑनलाईन फॉर्म भरून नावनोंदणी करता येईल.
- तुम्ही **https://eci.gov.in** वर जाऊ शकता यावरून फॉर्म ६ ची छापील प्रत घेऊन पेनाने भरता येईल. त्यासोबत आवश्यक ती कागदपत्रे जोडा आणि छापील प्रत मतदार मदत केंद्रावर (VHC) जाऊन सादर करा.



### सोयीस्कर मतदार मदत केंद्र कसे शोधायचे?


**https://ceo.maharashtra.gov.in/Lists/VHCs.aspx** ला भेट द्या. तुमचा जिल्हा निवडा. म्हणजे तुम्हाला मतदार मदत केंद्रांची यादी मिळेल. त्यामध्ये केंद्राचा पूर्ण पत्ता आणि दूरध्वनी क्रमांकही असेल. त्यावरून केंद्र निवडा आणि तिथे जाऊन फॉर्म ६ सादर करा.



### जर कुणी आंतरजाल न वापरणारे असेल तर?

जवळच्या मतदार मदत केंद्रावर फॉर्म ६ उपलब्ध आहे. तिथूनच फॉर्म ६ घेऊन आणि तो भरून तिथेच सादर करता येईल.

## याविषयी अधिक माहिती मला कुठे मिळेल?




- **https://eci.gov.in** मतदान प्रक्रियेशी संबंधित कायदे, नियम आणि भारतीय निवडणूक आयोगाने विहित केलेली मार्गदर्शक तत्त्वे याविषयीच्या माहितीसाठी.
- **https://ceo.maharashtra.gov.in** महाराष्ट्र राज्याशी संबंधित निवडणूक विषयक माहितीसाठी (मतदार मदत केंद्रे, मतदार यादीत तुमचे नाव शोधणे इ.)
- मतदान केंद्रांच्या यादीसाठी **https://ceo.maharashtra.gov.in/Lists/ListPSs.aspx**
- **https://www.nvsp.in** ऑनलाईन मतदार नोंदणी, दुरुस्ती, वगळणे इत्यादी साठी
- **https://eci-citizenservices.eci.nic.in** तक्रारींसाठी
- भारत निवडणूक आयोगाने विकसित केलेल्या PWD ॲप द्वारे माहिती मिळू शकेल. हे ॲप गुगल प्ले स्टोअरवर उपलब्ध आहे.




## मतदान करत असताना मला काय मदत मिळेल?

- अपंगांना तसेच त्यांच्या सोबतचे जोडीदार आणि नातेवाईक यांना जाणे-येणे सुलभ व्हावे यासाठी मतदान केंद्रांवर योग्य ती व्यवस्था करण्यात येणार आहे.
- तुम्हाला आवश्यक ते सहकार्य देण्याविषयी निवडणूक अधिकाऱ्यांनाही सचेतन करण्यात आले आहे.
- स्वतंत्र रांग आणि प्राधान्याने मतदान करण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे.
- मतदानदिनी संभाव्य अडथळे दूर करण्याविषयी कर्मचारी, स्वयंसेवक आणि समाजाकडून सकारात्मक तसेच कृतिशील प्रतिसाद मिळेल.
- व्हीलचेअर्स, स्वयंसेवक, सांकेतिक पाट्या, मदत केंद्र, सहज वाचता येण्याजोगी पत्रके, ब्रेल मतपत्रिका / उमेदवारांची यादी यासह ब्रेल इव्हीएम्स (Braille EVMs) इ. मतदान केंद्रावर उपलब्ध असणार आहेत.
- अंध व्यक्ती आपले मत देण्यासाठी फॉर्म ४९ए भरून आपल्या साथीदाराची मदत घेऊ शकतात.
- अपंग व्यक्तींसाठी पार्किंगची विशेष सोय असेल; जे अपंग मतदार सार्वजनिक वाहनांचा उपयोग करतील त्यांना मतदान केंद्रापर्यंत विनामूल्य प्रवास करता येईल.
- PWD ॲप द्वारे मदतीची मागणी करता येईल.



**सर्वसमावेशक मतदानाच्या मार्ग आणि पद्धत दृढ करण्यासाठी मोठ्या संख्येने या. सहभागी व्हा.**
**तुमच्या उपस्थितीची जाणीव करून द्या!**




**कसे? असे...**

- तुमची मतदार म्हणून नोंदणी आणि मतदान करून.
- इतरांना नोंदणी आणि मतदानासाठी प्रवृत्त करून.
- स्पर्धेत उतरलेले राजकीयपक्ष, व्यक्ती यांचा आणि त्यांच्या धोरणांचा अभ्यास करून, तुम्हाला महत्त्वाच्या वाटणाऱ्या मुद्द्यांच्या बाजूने मत देऊन.

**का? कारण...**

- २००१ पासून जनगणनेत अपंगांचा समावेश केला गेला आहे (त्यासाठी अनेकांना त्यावेळी आवाज उठवावा लागला.)
- २०१४ पासून निवडणूक कर्मचाऱ्यांना अपंगत्वासंबंधी प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्यास सुरुवात झाली. (हा उपक्रम राबवावा यासाठी त्यावेळी अनेकांनी अथक पाठपुरावा केला.)
- २०१५ मध्ये 'सुगम्य भारत' मोहिमेला प्रारंभ झाला. (अनेकांनी हे घडून येण्यासाठी त्यावेळी परिश्रम केले.)
- २०१६ मध्ये अपंग हक्क कायदा सुधारणा करून लागू केला. (हा मैलाचा दगड पार करण्यासाठी अनेकांना त्यावेळी मोठे योगदान द्यावे लागले.)

**आता अपेक्षित साध्य न गाठण्याचे कारणच उरलेले नाही.**



मतदान करा
(भारतीय सांकेतिक भाषेमध्ये)

तुम्ही भारतीय नागरिक आहात. तुमचा आवाज सर्वांपर्यंत पोहोचला आहे आणि त्यामुळे फरक पडण्यास मदत होत आहे.

**तुमचे अस्तित्व पुन्हा एकवार जाणवू द्या.**

**मतदान करा.**

मतदान करा
(ब्रेल लिपीमध्ये)

महाराष्ट्र

# Vidhan Sabha Elections 2019

# What is your take?





**Don't let your DISABILITY keep you away from casting your vote this 2019.**

**Give democracy a fair chance!**

**Give India an opportunity to move towards inclusion!**

**All citizens over 18 have the right to vote.**
**DISABILITY– No Bar.**
**Let's make it happen.**
**Your disability may be invisible, not you!**
**Be seen! Be heard!!**




## How can I register my name in electoral roll?

- The basic process to register in electoral roll is to fill up a form. This is known as form 6. One needs to fill this up and attach necessary documents like photo identity proof, residence proof etc.
- One can furnish his/her disability details in row (k) so that the details can be tagged to respective polling booth for providing appropriate facilitation
- If you are already enrolled and wish to add your disability details or need assistance contact your booth level officer

## Where does one get this form?


- If you have access and working knowledge of internet technology, then you can go to **National Voters' Services Portal (NVSP) https://www.nvsp.in** and fill up the form. Information here is available in English as well as in Indian languages. Here, you fill the form online and submit it online

OR

- You can visit **https://eci.gov.in,** Take a print of form 6 from website and fill it with a pen. Attach necessary documents and submit the hard copy by visiting a VHC (Voter's Help Center)

## How do I find a convenient Voter's Help Centre (VHC)?


**Visit https://ceo.maharashtra.gov.in/Lists/VHCs.aspx.** Select your district. You will get a list of VHCs. It will also give you complete address with phone numbers. Select a center and go there to submit your form 6.





## What if one is not an internet user?

Form 6 is available at your nearest VHC. One can collect the form from there and submit it after filling it up.



## Where do I get more information?

- **https://eci.gov.in** for information regarding Acts, Rules and Guidelines related to election process
- **https://ceo.maharashtra.gov.in** for information regarding election updates for the state of Maharashtra (VHCs, Search your name in Electoral Roll, etc.)
- **https://ceo.maharashtra.gov.in/Lists/ListPSs.aspx** for list of polling stations
- **https://www.nvsp.in** for online registration
- **https://eci-citizenservices.eci.nic.in** for grievances
- The Election Commission of India has developed PWD App for facilitiation and informations. This App is available on Google Play Store.




## What support will I get while casting vote?

- All the polling booths are being made accessible to PwDs
- The election officers are being sensitized to provide necessary assistance
- Separate queue and priority voting for PwDs
- Positive and proactive attitude towards the possible difficulties on the voting day by the staff, volunteers and community
- Volunteers, wheelchairs, signages, help desk, easy to read posters, braille EVMs with braille ballot sheet/candidate sheet are available in all polling booths
- A blind voter can also take the assistance of a companion in casting his/her vote by filling form 49a
- Dedicated parking is also available for vehicles of voters with disabilities; Those who use public transport can travel to polling booth for free
- Support can be sought through PWD App

**Give an opportunity to the system to learn ways and means for Inclusive Voting! Turn up in big numbers. Let the system get used to YOU!**






**Here is how:**

- By registering and voting yourself
- By inspiring others to register and vote
- By studying competing political parties, individuals and their manifestos to stand by issues close to your heart

**Here is why:**

- Since 2001, People with Disabilities have been included in the Census. (Many had to raise voice THEN)
- Since 2014, active training of electoral staff on disabilities began (Many had to push this agenda tirelessly THEN)
- In 2015, The Accessible India Campaign was launched (Many had to run extra miles to make that happen)
- In 2016 RPwD (Rights for Persons with Disabilities) Act was enacted with improved features (Many were roped in towards this milestone development THEN)

**There is no reason why things would not take desirable steps NOW.**



VOTE
(In Indian sign language)

You are citizens of India.
Your voice was heard
and will continue to help
make the difference.

**MAKE YOUR PRESENCE FELT YET AGAIN.**
**CAST YOUR VOTE**

VOTE
(In Braille)

For more information, please call on helpline number 1950 (toll free) or log on to https://ceo.maharashtra.gov.in.

Follow us on

Published in the public interest on behalf of Chief Electoral Officer, Maharashtra State.